**विशेष लेख**

# डॉ. आंबेडकरांचे सहकारी– नवल भथेना

प्रबोधन पोळ

या वर्षीच्या ३१ जानेवारीला डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी सुरू केलेल्या मूकनायक या पाक्षिकाला नुकतीच ९८ वर्षे पूर्ण झाली. ह्या पाक्षिकाने एक नव्या क्रांतिकारी आवाजाला आविष्कृत केले ज्याचे रूपांतर बुलंद आणि धारदार चळवळीमध्ये झाले. ३१ जानेवारी १९२० रोजी डॉ. आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली मूकनायकची सुरुवात झाली. कालांतराने आंबेडकरांनी बहिष्कृत भारत, जनता, समता आणि प्रबुद्ध भारत या दर्जेदार वृत्तपत्रांची निर्मिती केली. मूकनायकच्या उभारणीमध्ये डॉ. आंबेडकर यांच्या व्यतिरिक्त अनेकांचे मोठे योगदान राहिले आहे. पण काळाच्या ओघात त्यांचे योगदान इतिहासाच्या ढिगाऱ्यात सध्या तरी अदृश्य झाले आहे. यामध्ये नवल भथेना या पारशी गृहस्थाचे नाव विशेषतः घ्यावे लागेल. त्यांनी मूकनायक च्या उभारणीमध्ये महत्त्वाचे योगदान दिले आहेच पण त्याच बरोबर डॉ. आंबेडकरांच्या वैयक्तिक आयुष्यामध्येदेखील त्यांचे स्थान सदैव महत्त्वाचे राहिले. पण आजदेखील त्यांच्याबाबत तुरळक माहितीच उपलब्ध आहे. ह्या मर्यादित माहितीच्या आधारावर त्यांच्या व्यक्तित्वावर प्रकाश टाकणारा हा प्रस्तुत लेख!

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली सुरू झालेल्या चळवळीला ज्या दलितेतर व्यक्तींनी, विचारवंतानी व कार्यकर्त्यांनी आकार दिला त्यांच्याबाबत आंबेडकरी विचारवंतांमध्ये एक प्रकारचा अबोला आपल्याला नेहमीच जाणवतो. अर्थात यामध्ये काही अभ्यासकांचा/कार्यकर्त्यांचा नक्कीच अपवाद आहे (उदा. चांगदेव खैरमोडे, विजय सुरवाडे, अर्जुन डांगळे, इ.). आंबेडकरांच्या सोबत अनेक दलितेतर कार्यकर्त्यांनी त्यांच्या खांद्याला खांदा लावून दलित चळवळ पुढे नेण्यात योगदान दिले. त्यामध्ये भा. र. कद्रेकर, अनंत वि. चित्रे, देवराव नाईक, श्रीधरपंत बा. टिळक, सुरेंद्रनाथ टिपणीस, म. भि. चिटणीस, ग. नी. सहस्रबुद्धे, द. वि. प्रधान, कमलकांत चित्रे, शामराव परुळेकर, बॅरिस्टर म. बा. समर्थ, नवल भतेना अशी नावे समाविष्ट होतात. यामध्ये नवल भतेना यांच्याबाबत या लेखात चर्चा केली जाणार आहे. नवल भतेना हे डॉ. आंबेडकरांचे कोलंबिया विद्यापीठात शिकत असल्यापासूनचे अत्यंत जवळचे मित्र होते. म्हणून त्यांचा बाबासाहेबांशी असलेला संपर्क हा आंबेडकरी चळवळ सुरू होण्याअगोदरचा होता. भतेना हे सधन पारशी कुटुंबात जन्मले असल्यामुळे त्यांनी डॉ. आंबेडकरांना अनेक आर्थिक संकटातून वाचवले. आंबेडकरांच्या इतर दलितेतर सहकाऱ्यांसारखा भथेनांचा

लेखक सध्या दिल्ली विद्यापीठाच्या रामजस कॉलेजमध्ये इतिहासाचे सहायक प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत.
ईमेल prabodhanpol@gmail.com

चळवळीमध्ये थेट सहभाग कधीही नव्हता, तरीही त्यांची आंबेडकरांबरोबरची मैत्री जीवनभर अखंड राहिली. त्यांची आंबेडकरांबरोबरची जवळीक इतकी होती, की आंबेडकरांच्या कोणत्याही वैयक्तिक आणि कौटुंबिक संकटांमध्ये ते धाऊन जात असत.

भथेनांच्या वैयक्तिक आयुष्याबाबत कुठेच काही लिहिले गेले नसल्यामुळे त्यांच्याबाबत सार्वजनिक वर्तुळात खूप त्रोटक माहिती उपलब्ध आहे. आंबेडकरांच्या आयुष्यात (किमान पहिल्या टप्प्यात तरी) भथेनांचे इतके महत्त्वाचे स्थान असतानादेखील त्यांच्याबाबतचा मौन आश्चर्यकारक आहे. भथेना-आंबेडकर पत्रव्यवहारातून आणि भथेनांच्या प्रकाशित अनुभव कथनात्मक लेखातूनच आपल्याला त्यांच्या व्यवसायाबद्दल पुसटशी कल्पना येते. एके ठिकाणी ते स्वतः सांगतात, की कोलंबिया विद्यापीठातून रसायनशास्त्राचे शिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्यांनी व्यवसाय सुरू केला. औद्योगिक केमिस्टच्या व्यवसायात सक्रिय असणारे व तत्कालीन काँग्रेसचे मुंबई स्थित बडे नेते म्हणून नावा रूपास आलेल्या सर दिनशा वाच्छा यांच्या मदतीने भथेनांनी बहुधा याच क्षेत्रात आपला व्यवसाय सुरू केला असावा. पण त्यांच्या व्यावसायिक कारकिर्दीवर विस्तृतपणे अजून तरी माहिती उपलब्ध झाली नाही. तर दुसरीकडे आंबेडकर भथेनांच्या स्टॉक एक्स्चेंजमधील कारकिर्दीबाबत एका पत्रात उल्लेख करतात. स्टॉक एक्स्चेंजच्या उलाढालीदरम्यान झालेल्या तोट्याबद्दल आंबेडकर त्यांना हा व्यवसाय सोडून देण्यास सुचवतात. एकूणच असे दिसते, की ते जीवनभर सधन व्यावसायिक राहिले व त्या दरम्यान त्यांनी अनेक प्रकारच्या व्यवसायात आपले हात आजमावले असावेत.

भथेनांचा आयुष्यभर कोणत्याही चळवळीशी, सार्वजनिक जीवनाशी किंवा राजकारणाशी कसलाही थेट संबंध नव्हता. ज्यांनी कोणी त्यांच्यावर लिहिले त्या सर्वांनी आंबेडकरांच्या संदर्भातूनच त्यांचे व्यक्ती चित्रण केले आहे. अर्थात तेही खूप अल्प प्रमाणातच आहे. धनंजय कीर यांच्या आंबेडकर चरित्रामध्ये भथेनांवर पहिल्यांदा लिहिल्याचे आढळते. चांगदेव खैरमोडेदेखील त्यांच्या लिखाणात त्रोटकपणे भथेनांचा उल्लेख करतात. विजय सुरवाडे यांच्या पत्रव्यवहारातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर या खंडात भथेना आणि आंबेडकरांच्या एकूणच संबंधावर चांगला प्रकाश पडतो. तर सुरवाडे यांच्याच आणखी एका संपादित-संकलित पुस्तकात दस्तरखुद्द नवल भथेनांचाच आंबेडकरांवरचा अनुभव-कथनात्मक लेख प्रकाशित झाला आहे. हा लेख त्यांच्या संबंधांचा काही प्रमाणात स्पष्टपणे उलगडा करतो. सुरवाडेंचे भथेनांवर महत्त्वपूर्ण टीपणदेखील या पुस्तकात आढळते. या ग्रंथांशिवाय भथेनांवर कोणी नवं असं काही लिहिले नाही. या अति-अल्प ग्रंथ साधनांच्या आधारावरच आपल्याला भथेनांचे एक संक्षिप्त व्यक्तिचित्र मांडता येऊ शकते.

### कोलंबिया आणि नंतर

भथेना आणि आंबेडकरांचा प्रथम संबंध न्यू यॉर्क शहरात वसत असलेल्या कोलंबिया विद्यापीठामध्ये आला. १९१३मध्ये बडोद्याचे महाराज सयाजीराव गायकवाड यांच्या शिष्युवृत्तीवर आंबेडकर कोलंबिया विद्यापीठात उच्च शिक्षण घेण्यास गेले. तिथे पोहोचल्यावर ते हार्टले हॉंल डोर्मेटरी येथे वास्तव करू लागले. काही दिवसातच त्यांनी आपल्या निवासाचे स्थान बदलून कॉस्मोपोलीटन क्लब मध्ये राहायला गेले. पण तिथेदेखील त्यांचा जीव रमेना, व शेवटी त्यांनी लिविंगस्टन हॉल डोर्मेटरी मध्ये आपला निवास पक्का केला. याच लिविंगस्टन हॉंल डोर्मेटरी मध्ये त्यांची भेट भथेना यांच्याशी झाली. भथेनादेखील कोलंबिया विद्यापीठात शिकत होते. कोलंबियाच्या मुक्त वातावरणात आंबेडकरांचे भथेना यांच्याशीच नव्हे तर अनेकांशी आपुलकीचे आणि मैत्रीचे नाते तयार झाले. इथे त्यांना अनेक नामांकित प्राध्यापकांचा स्नेह

व बहुमोल मार्गदर्शन मिळाले. जॉन डीवी, एडविन सेलीग्मन, जेम्स शोट्वेल, आणि जेम्स हार्वे रॉबिन्सन या सारख्या प्रध्यापाकांच्या सानिध्यात आंबेडकरांची वैचारिक वाढ होऊ लागली. पुढे १९३० मध्ये बाबासाहेबांना त्यांचे जिवलग मित्र कोण आहेत या बाबत विचारणा केली असता त्यांनी कोलंबिया मधल्या प्राध्यापकांचा आणि मित्रांचाच संदर्भ दिला. ह्यावरून त्यांचे कोलंबिया विद्यापीठाशी असलेले वैचारिक आणि भावनिक नाते स्पष्ट होते, व त्याचबरोबर नकळत त्यांची भथेनां बरोबर असलेली दाट मैत्री सुद्धा प्रकाशात येते.

तसं पाहायला गेलं तर भथेना आणि आंबेडकरांमध्ये स्वभावानुसार किंवा आवडी-निवडी नुसार म्हणावी तितकी साम्यता बहुधा नव्हती. भथेना हे उच्चवर्गीय सधन पारशी कुटुंबात जन्मले आणि वाढले होते. तर दुसरीकडे आंबेडकर हे गरीब व अस्पृश्य दलित कुटुंबात जन्मले व वाढले होते. भथेना कोलंबिया विद्यापीठात रसायनशास्त्राचे विद्यार्थी होते, तर आंबेडकर अर्थशास्त्र व राज्यशास्त्राचे विद्यार्थी होते. चर्चा करण्यासाठी सामाईक गोष्टी फारशा नसल्या तरीदेखील दोघांची मैत्री विद्यार्थी काळातच चांगली दृढ झाली होती. न्युयॉर्क मध्ये असताना भथेनांची गट्टी आणखी काही महाराष्ट्रीय विद्यार्थ्यांशी जमली होती, पण त्यांच्या प्रकाशित आठवणींपर लेखानुसार, त्यांच्या अनेक मित्र-मैत्रिणींपैकी फक्त आंबेडकरांबरोबरच त्यांचे चांगले जमत असत (सुरवाडे, २००३). दुसरीकडे आंबेडकरांचादेखील विद्यापीठात मोठा मित्र परिवार असे. पण कालांतराने अभ्यासाच्या वाढत्या व्यापामुळे त्यांनी तिथल्या अनेक मित्रांशी गट्टी कमी केली. पण भथेनांबरोबरची मैत्री तशीच अबाधित राहिली. भथेनांच्या नुसार आंबेडकरांच्या शिक्षणातील प्रगती अगदी पहिल्या दर्जाची होती, व म्हणून त्यांची विद्यापीठात सर्वत्र प्रशंसा व आदर केला जात असत. तरी, भथेनांच्या मते, कोलंबियामध्ये शिकत असताना आंबेडकरांचे जवळचे एकमेव मित्र फक्त तेच असत. या विधानामध्ये खूप तथ्यता आहे. खैरमोडे नुसार आंबेडकर कोलंबिया विद्यापीठात शिकत असताना साताऱ्यातील त्यांच्या लहानपणीच्या शाळेतील एक वर्गबंधू (श्री दीक्षित) विद्यापीठात शिकायला न्युयॉर्क शहरात आला होता. इतकी जुनी ओळख असतानादेखील आंबेडकरांचा बहुधा त्या विद्यार्थ्याशी न्युयॉर्क मध्ये व पुढे भविष्यात फारसा संबंध आला नसेल. किमान कागदोपत्री उल्लेख तरी आढळत नाही.

या उलट भथेना यांच्या बरोबर आंबेडकरांचा संबंध फक्त कोलंबिया पुरताच राहिला नाही तर तो आजीवन अबाधित व दृढ राहिला. कोलंबियात असताना भथेना आणि आंबेडकर दररोज एकत्र जेवण करत असत. भथेनांच्या मते आंबेडकरांना अन्नाची मोठी भूक होती पण पैश्या अभावी त्यांना ती भागवता येत नसे. भथेना यांचीदेखील तशीच हलाकीची परिस्थती होती. या मुळे ते दोघे नेहमीच पैसे वाचवण्याच्या युक्त्या शोधत असत. न्युयॉर्क मध्ये असताना पुस्तक खरेदीसाठी आंबेडकर भथेनांनाच आपल्या बरोबर घेऊन जात असत. या निमित्ताने भथेना आवर्जून सांगतात, की पुस्तक वाचनाच्या अतोनात आवडीमुळे आंबेडकर दर शनिवारी चार ते पाच तास पुस्तकांच्या दुकानात घालवत असत. त्यांच्या सोबत भथेनादेखील पुस्तक खरेदी मोहिमेत आनंदाने सामील होत. न्युयॉर्क मध्ये वास्तव्यात असताना भथेना यांचा सर दिनशा वाच्छा यांच्याशी संपर्क वाढला. वाच्छा हे तत्कालीन काँग्रेसचे मुंबईतील ज्येष्ठ व वजनदार नेते होते. ते काँग्रेसच्या संस्थापक-सदस्यां पैकी एक होते व १९०१ मध्ये ते पक्षाचे अध्यक्षदेखील भूषवले होते. भथेना आणि वाच्छा दोघेही पारसी असल्याकारणाने त्यांचा एकमेकांशी बहुधा पूर्वीपासूनच संपर्क झाला असावा. असो. या संबंधांमुळेच आंबेडकरांचादेखील वाच्छाशी परिचय झाला. कोलंबिया विद्यापीठात असताना आंबेडकरांनी भथेनांकरवी वाच्छांना एक-दोन पत्रे पाठवली व त्यांचे तत्पर उत्तरेदेखील त्यांना मिळाले.

कोलंबियातून डॉक्टरेटचे प्रबंध लेखन संपवून (१९१६ मध्ये) आंबेडकरांनी लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स तथा ग्रेय्स इन्न मधून आपले उरलेले शिक्षण पूर्ण केले. तिथे त्यांनी अजून एक डॉक्टरेट पदवी मिळवली व ब्यारीस्टरीचा अभ्यासदेखील पूर्ण केला. त्यांचा लंडन मधील संपूर्ण अभ्यासक्रम जरी १९२३ मध्ये पूर्ण झाला असला तरी त्यांना १९१७ मध्ये तीन वर्षांसाठी भारतात यावे लागले होते. बडोदे सरकारची शिष्युवृत्ती बंद झाल्यामुळे त्यांना (अगोदरच ठरविलेल्या अटी प्रमाणे) ताबडतोब बडोदे दरबाराच्या नोकरीत रुजू व्हावे लागले. परंतु बडोदे येथे आलेल्या वाईट आणि अपमानास्पद अनुभवामुळे त्यांनी बडोदे सरकारची नोकरी सोडून मुंबईत नोकरी करण्याचे ठरविले. इथे राहून त्यांना आपल्या खंडित शिक्षणासाठी पैशांची जमवाजमव करायची होती. या कामी सुद्धा त्यांना बहुमोल मदत मिळाली ती भथेनांचीच. जेव्हा आंबेडकर मुंबईत नोकरीसाठी वणवण फिरत होते तेव्हा पारशी कुटुंबात पहिली शिकवणी मिळवून देण्यात भथेनांच जबाबदार होते. त्याच दरम्यान त्यांना प्रा. के. बी. इराणी यांच्या साह्याने आणखी एका पारशी कुटुंबात शिकवणुकीचे काम आंबेडकरांना मिळाले. दोन्ही शिकवण्यांचे त्यांना प्रत्येकी ५० रु. दरमहा मिळत असत. पुढे, १९१८मध्ये त्यांची सिडनहॅम कॉलेजमध्ये दोन वर्षासाठी दरमहा ४५० रु. पगारावर नेमणूक झाली. भथेनांनी दिनशा वाच्छा यांच्या माध्यमाने या कॉलेजात आंबेडकरांना नोकरी मिळवून देण्यामध्ये मोलाची कामगिरी बजावली. ही नोकरी आंबेडकरांच्या पुढील शिक्षणासाठी अत्यंत महत्त्वाची होती व यामध्ये भथेनांचे योगदान फार मोठे होते.

आंबेडकरांचा सिडनहॅम कॉलेजमध्ये नोकरी मिळवण्याचा उद्देश्य इतकाच होता, की त्यांना त्यांच्या खंडित शिक्षणासाठी पैसा जमा करून इंग्लंडला प्रयाण करायचे होते. ते त्यांच्या पगारातून ३५० रु. महिन्याकाठी बाजूला काढत असत व भथेना यांच्याकडे जमा करत. भथेनांनी लिहिल्यानुसार पुढील शिक्षणासाठी आंबेडकर इंग्लंडला जाण्यास निघेपर्यंत त्यांनी आंबेडकरांचा पैसा स्वतःकडे साठविला. एवढेच काय तर शिक्षण पूर्ण करण्यासाठी भथेनांनी आंबेडकरांना ५००० रुपयांचे वचनचिट्ठीवर कर्जदेखील दिले. याच काळात आंबेडकर सार्वजनिक आयुष्यात सक्रिय होऊ लागले होते. १९२० उलटेपर्यंत बाबासाहेबांनी सार्वजनिक जीवनात प्रवेश करून आपला अनन्य ठसा उमटवण्यास सुरुवात केली होती. इंग्लंडला जाऊन डॉक्टरेट आणि बॅरिस्टरी संपवून त्यांना सार्वजनिक आयुष्यातील आपले कार्य चालू ठेवायचे होते.

**मूकनायक आणि नवल भथेना**

३१ जानेवारी १९२०ला मूकनायक नावाचे पहिले पाक्षिक डॉ. आंबेडकरांनी सुरू केले. मूकनायकच्या आगमनाने दलित चळवळीला एक वेगळे वळण मिळाले. ही सुरुवात आक्रमक आणि संघटित दलित राजकारणाची नांदी होती. जरी मूकनायक जास्त दिवस चालले नसले तरी ते नव्या चळवळीचे आणि नव्या राजकारणाचे प्रतीक होते. सिडनहॅममधल्या नोकरीच्या अटींमुळे आंबेडकर स्वतः मूकनायकचे संपादक होऊ शकले नाहीत. यामुळे सुरुवातीला पांडुरंग नंदराम भटकर आणि नंतर, ज्ञानदेव धृवनाथ घोलप यांच्या संपादकत्वाखाली मूकनायकचे अंक प्रकाशित होऊ लागले. वास्तविक पाहता प्रकाशनाच्या पहिल्या वर्षी आंबेडकर स्वतःच मूकनायकचे सर्व लिखाण करत असत. भटकर आणि घोलप नावापुरतेच संपादक होते. पण इंग्लंडला गेल्यानंतर त्यांना आपले पाक्षिक सांभाळणे कठीण झाले होते. म्हणून त्यांनी मूकनायकची सर्व जबाबदारी त्यांचे त्या काळातील अत्यंत जवळचे स्नेही व चांभार समाजातील तरुण कार्यकर्ते सीताराम शिवथरकर आणि मूकनायकचे तत्कालीन संपादक ज्ञानदेव घोलप यांच्यावर संयुक्तपणे सोपवली होती. पण कालांतराने शिवथरकर आणि घोलप यांच्या

आपसातील सदैव होणाऱ्या भांडणामुळे मूकनायकचे अस्तित्वच धोक्यात आले. ह्या भांडणामुळे बाबासाहेबांना मूकनायकच्या व्यवस्थापनावर नियंत्रण ठेवणे खूप मुश्कील झाले होते. त्यात मूकनायकची आर्थिक स्थिती वाईट असल्याकारणाने तो बंद होण्याचा मार्गावर आला होता. भथेनांनीच या काळात मूकनायकला आर्थिकरित्या सावरले.

भथेना आणि आंबेडकर यांच्या दरम्यान या काळात झालेला पत्रव्यवहार हा भथेनांच्या मूकनायकसाठी केलेल्या योगदानावर सूक्ष्मपणे प्रकाश टाकतो. हा सबंध पत्रव्यवहार इंग्रजी भाषेत आहे. २७ ऑगस्ट १९२० रोजी भथेना हे आंबेडकरांना पत्र पाठवून घोलप यांना मूकनायकसाठी पैसे दिल्याचे कळवतात. त्या पत्रामध्ये संकट काळी मदत केल्याबद्दलचा भथेनांच्या स्वरामध्ये दिखावूपणा किंवा मोठेपणाचा आव यत्किंचितदेखील दिसत नाही. उलट त्या पत्रामध्ये आंबेडकरांच्या हितचिंतकाच्या प्रेमाची अनुभूतीच होते. आंबेडकरांचे भथेनांना पाठवलेले पत्र सुद्धा तितकेच बोलके आहे. याकाळात त्यांनी भथेनांना पाठवलेली दोन पत्रे प्रकाशित झाली आहेत (सुरवाडे, १९८६). या दोन्ही पत्रांत आंबेडकर भथेनांचे मनःपूर्वक आभार मानतात व कृतज्ञतेने त्यांना लिहितात, माझ्यामुळे तुला त्रास होतो या विषयी मला अत्यंत खेद वाटतो. माझ्यावर विश्वास ठेव, की अत्यंत घनिष्ठ मित्रही सहन करू शकणार नाही एवढा त्रास तुला माझ्यामुळे सहन करावा लागतो, याची मला पूर्णपणे जाणीव आहे. या ना त्या कारणासाठी माझी सतत निकडीची मागणी असते. त्यामुळे तुझाही नाईलाज होऊन, माझा एकमेव आणि अत्यंत जवळचा प्रिय मित्र माझ्यापासून दुरावणार नाही, एवढीच मी आशा करतो (सुरवाडे, २००३). भथेनांना मित्रत्वाच्या नात्यामध्ये आभार मानण्याचा औपचारिकपणा बहुधा पसंत आला नसावा. म्हणून ते आंबेडकरांना त्यांच्या उत्तरात प्रेमपूर्वक रागावतात. भथेनांचे आंबेडकरांना पाठवलेले दुसरे पत्र उपलब्ध नसले तरी आंबेडकरांच्या दुसऱ्या पत्रात भथेनांची प्रतिक्रिया स्पष्टपणे समजून येते. भथेना हे आंबेडकरांना बहुधा निक्षून सांगत होते, की त्यांनी केलेली मदत ही आंबेडकरांसारख्या एका लायक व्यक्तीस केली होती व ते हर तऱ्हेने त्या मदतीस पात्र होते.

आंबेडकर ह्याच पत्रव्यवहारात उद्योगपती गोदरेज यांचा उल्लेख करतात. मूकनायक आपल्या सुरुवातीच्या अंकात गोदरेज कंपनीच्या सेफची (तिजोरी/कपाट) जाहिरात छापत असे. गोदरेजसारख्या नामांकित कंपनीची जाहिरात मूकनायकसारख्या नवख्या दलित पाक्षिकाला मिळण्यामध्ये नवल भथेनांचाच मोठा वाटा होता. ही जाहिरात मूकनायकला आर्थिक बळ मिळण्यासाठी अत्यंत महत्त्वाची होती. एका पत्रात आंबेडकर हे भथेनांना उद्योगपती गोदरेज यांची त्वरित भेट घ्यावी असं आग्रह धरतात व भेट घेऊन त्यांना जाहिरातीच्या पैशांबाबत विचारणा करावी अशी विनंती सुद्धा करतात. ह्यावरून भथेनांचा मूकनायकशी किती जवळचा संबंध होता हे प्रकर्षाने जाणवते. परंतु ह्या संक्षिप्त पत्रव्यवहारामध्ये त्यांच्या मैत्रीच्या अनेक पैलूंचा विस्तृतपणे उलगडा होऊ शकतो. भथेना आणि आंबेडकरांच्या मैत्रीमध्ये कुठेही ढोंगीपणा दिसत नाही. त्यांच्या मैत्रीमध्ये वैचारिकतेचा बडेजावपणाही दिसत नाही. हे एक निव्वळ प्रेमाचे नाते होते. पण ह्या वैयक्तिक नात्याचा चळवळीला अतोनात फायदा झालेला हेही आपण विसरून चालू शकत नाही. आंबेडकर एका महत्त्वाच्या चळवळीचे अग्रणी नेते होण्याअगोदर त्यांना अनेक संकटांशी सामना करावा लागला. अशा वेळेस भथेनांची मैत्री त्यांच्यासाठी खूप महत्त्वाची ठरली. उदाहरणार्थ, जेव्हा आंबेडकर इंग्लंडमधील आपले शिक्षण पूर्ण करून भारतात कायमचे आले, तेव्हा त्यांना बाटलीबॉय इनस्टीट्यूट ऑफ अकौंटसी या संस्थेत भथेना यांच्याच शिफारसीमुळे अंशकालीन नोकरी मिळाली. दुसरीकडे, आंबेडकरांनी इंग्लंडवरून भारतात पाठवलेली पुस्तके मुंबईमध्ये

स्वीकारण्याचे काम भथेना यांनी केल्याचे एका पत्रामध्ये आपल्याला संदर्भ आढळतो. भथेना हे अनेक वेळेस आंबेडकरांची अनेक महत्त्वाचे कामे करून आंबेडकरांचा ताप वाचवत असत.

दुसरीकडे, भथेनांच्या प्रकाशित लेखामध्ये आपल्याला एक मनोरंजक गोष्ट सापडते. भथेना हे १९२० आणि ३०च्या दशकात महात्मा गांधींचे कट्टर समर्थक होते. ते १९२१मध्ये गांधींच्या नेतृत्वाखाली सुरू झालेल्या असहकार्य आंदोलनातही सक्रियपणे सहभागी झाले होते. परिणामतः, चर्चेच्या वेळी आंबेडकर आणि भथेना एकमेकांवर राग करत असत किंवा काही वेळेस खेकसत सुद्धा असत. पण भथेनांच्या भिन्न राजकीय विचारांचा त्यांच्या मैत्रीवर कसलाच परिणाम झाला नाही. एवढेच नव्हे तर पुणे कराराची पार्श्वभूमी असलेल्या गांधींच्या १९३२ च्या आमरण उपोषणाच्या वेळीदेखील गांधींचे कट्टर समर्थक असलेले भथेना यांची आंबेडकरांच्या बरोबरची मैत्री अबाधित राहिली. या उपोषणादरम्यान काँग्रेसच्या अनेक बड्या नेत्यांनी भथेनांना गाठले व आंबेडकरांचे मन वळविण्याबाबत याचना केली. परंतु त्यांनी या याचनांना काहीच भीक घातली नाही. उलट त्यांनी त्यांच्या लेखामध्ये लिहिले आहे, की आंबेडकरांचे मन त्यांना पक्के माहीत असल्यामुळे त्यांचे मन वळविण्याचा प्रयत्न करणे ही एक निव्वळ निष्फळ बाब होती.

## आंबेडकरांची अखेरची वर्षे आणि भथेना

१९४०च्या दशकात डॉ. आंबेडकरांच्या राजकीय कारकिर्दीमध्ये मोठे बदल झाले. १९४२मध्ये त्यांनी व्हाईसरॉय कौन्सिलमध्ये भारताचे मजूर मंत्री म्हणून कार्यभार स्वीकारला व त्यानंतर दिल्लीच्या राष्ट्रीय राजकारणात ते सक्रिय झाले. कालांतराने ते संविधान समितीवर निवडून गेले व स्वतंत्र भारताचे पहिले कायदेमंत्री झाले. एवढ्या अखंड व्यापात असतानादेखील आंबेडकर मुंबईला आले, की भथेनांबरोबर भेट घेत असत, आणि अन्य वेळी पत्रांच्या माध्यमातून ते नेहमी संपर्कात रहात असत. भथेना स्वतः सांगतात, की आंबेडकरांच्या मंत्रिपद कारकिर्दीदरम्यान आंबेडकर त्यांच्या सचिवामार्फत जेथे जेथे निरोप पाठवीत असत तेथे तेथे ते जाऊन आंबेडकरांना भेटत असत. अनेकवेळा त्यांची भेट सकाळी ७ ते ९च्या दरम्यान, म्हणजेच नाष्ट्याच्या वेळी किंवा मग रात्री १० नंतर होत असे. वैयक्तिक भेटी दरम्यान तथा पत्रव्यवहारांदरम्यान त्यांच्या चर्चांचा विषय साधारणतः कौटुंबिकच असे. १९३५मध्ये झालेल्या रमाबाईंच्या अकाली निधनामुळे आंबेडकरांचे कौटुंबिक आयुष्य निराशाजनक झाले होते. रमाबाईंच्या अनुपस्थितीमुळे त्यांना त्यांच्या मुलांबाबत (मुलगा यशवंत आणि पुतण्या मुकुंद) ते सदैव चिंतित असत. या समस्येचे निरसन करण्यासाठी ते भथेनांशी वारंवार चर्चा करत असत. १९४८मध्ये आंबेडकर भथेनांना एका पत्रात लिहितात, की बाप आपल्या मुलांच्या हितासाठी जसा झटतो, तसा तू माझ्या मुलांसाठी झटून त्यांना सतत चालत राहील असा काहीतरी धंदा शिकव. या पत्रामध्ये एका बापाची कळकळ स्पष्टपणे दिसत आहे. पण त्याचबरोबर आपल्या वैयक्तिक समस्या आणि चिंता भथेनांबरोबर व्यक्त होऊन आंबेडकरांची त्यांच्याशी असणारी जिवलग दोस्ती पुन्हा एकदा प्रदर्शित होते. आंबेडकरांच्या विनंतीखातर भथेना यांनी यशवंत आणि मुकुंद यांना लॉन्ड्रीच्या धंद्यात भागीदारी मिळवून दिली. पण दुर्दैवाने दोघे या धंद्यात म्हणावे तसं यश प्राप्त करू शकले नाहीत. असो.

बाबासाहेबांच्या मृत्यूच्या दोन महिने अगोदर भथेना बाबासाहेबांना त्यांच्या मुंबईच्या निवासस्थानी भेटले होते. या बाबत भथेनांनी स्वतः त्यांच्या लेखात लिहिले आहे. ते म्हणतात, की तीन तास चाललेल्या या बैठकीत डॉ. आंबेडकर त्यांच्याशी अंतःकरणापासून बोलत होते. त्यांच्या या भेटी दरम्यान डॉ. आंबेडकर

**(पान नं. ४१ वर)**

घरातील मुले मुली धडपडत शाळा, कॉलेजमध्ये जात आहेत. वेळ पडलीच तर पोटाला चिमटा काढून आई वडील त्यांना शिकवीत आहेत. त्यांनी वित्तीय क्षेत्रातील गुंतागुंतीच्या बाबी स्वतः समजून घेतल्या पाहिजेत. आई वडिलांशी चर्चा केली पाहिजे. हे व्यवहार करण्यातील धोके काय असू शकतात हे आई वडिलांना समजावून दिले पाहिजेत.

गरीब लोक बचती करतात, कर्जाचे हप्ते फेडतात, विम्याचे व पेन्शन पॉलिसीचे भरतात. कसे? सगळ्या प्रश्नाचे एकच उत्तर आहे : त्यांच्या स्वतःच्या श्रमातून! दुसऱ्या शब्दांत कोणतेही वित्तीय प्रॉडक्ट घेतले, की ते गरिबांच्या श्रमात वाटा मागते. आणि गरिबांनी स्वतःच्या श्रमाचे मोल स्वतः नाही जाणले तर मग त्यांचा वाली कोणी नसेल. म्हणून वित्तीय प्रॉडक्ट्स व सेवा घेण्याचे सर्वच निर्णय गरिबांनी साधकबाधक विचार करूनच घेतले पाहिजेत. वित्तीय साक्षरतेचा हेतू सामान्य लोकांचे जनरल नॉलेज वाढवणे नाही. तर गरिबांचे सक्षमीकरण करणे हाच असला पाहिजे आणि गरीब पुरेसे सक्षम झाले असे त्याच वेळी म्हणता येईल ज्यावेळी ते त्यांच्या बचती दामदुप्पट पैसे करून देतो म्हणणाऱ्याला पिटाळून लावतील, कर्ज देतो म्हणणाऱ्याला थांब विचार करून, हिशोब करून सांग ते म्हणतील!

गरिबांच्या भल्यासाठी नेहमीच संवेदनशील राहून, त्यांच्या हक्कांसाठी कार्यरत असणाऱ्या, वेळ प्रसंगी शासनाशी पंगा घेणाऱ्या डाव्या परिवर्तनवादी राजकीय शक्तींनी वित्तीय साक्षरतेततून गरिबांना अधिक सक्षम करता येईल यावर विश्वास ठेवून कृती कार्यक्रम आखले पाहिजेत. त्यातून गरिबांना संघटित करण्यासाठी एक संघटनात्मक कार्यक्रम तर मिळू शकतोच पण गरिबांना देखील डावी परिवर्तनवादी चळवळ आपली आहे याबद्दल विश्वास येईल.

●

---

**प्रबोधन पोळ..** **(पान नं ३५ वरून)**

फक्त त्यांच्याशीच बोलत होते व इतर कोणालाही त्या खोलीमध्ये प्रवेश दिला गेला नव्हता. या भेटीत आंबेडकरांनी त्यांच्याशी कौटुंबिक आणि इतर गोष्टींवर मोकळेपणाने चर्चा केली. यावेळी आंबेडकरांची खालावलेली तब्येत सुद्धा प्रकर्षाने त्यांना जाणवली व तब्येतीच्या बाबतीतला निराशावादी सूर सुद्धा दिसला. बाबासाहेबांना बहुधा त्यांच्या मृत्यूची चाहूल लागली असावी असे भथेनांना त्यांच्या संभाषणातून जाणवत होते. म्हणूनच त्यांनी भथेनांना ह्या भेटीच्या दरम्यान पीपल्स एजुकेशन सोसायटीच्या कामकाजात लक्ष घालण्याचा आग्रह धरला होता. त्याच बरोबर आंबेडकरांना सुरू करावयाच्या नियोजित तंत्र संस्थेतदेखील भथेनांनी जातीने लक्ष घालावे म्हणून त्यांनी भथेनांना आग्रहाचे आमंत्रण दिले होते. एवढे असूनही भथेनांनी या सर्व गोष्टी टाळल्या. भथेना आंबेडकरांच्या एकाही संस्थेत किंवा पक्षात सहभागी झाले नाहीत किंवा कोणतीही मानाची जागा पटकावून घेतली नाही. ही भथेनांच्या मनाची श्रीमंती होती व त्यांच्या मित्राप्रती असलेली प्रेमाची बांधिलकी देखील.

●

**वाटसरूची वर्गणी पाठवण्याचा / पत्रव्यवहाराचा नवा पत्ता**

परिवर्तनाचा वाटसरू
५९/६४, कौस्तुभ अपार्टमेंट, दुकान नं. ७ ए, कसबा पेठ, फणी आळी तालमीजवळ, पुणे ४११०११
भ्र. ७७७६९०२२६७